नवशक्ति
मुंबई, गुरुवार, २७ जुलै २०१७

# दि धरमसी मोरारजी केमिकल कंपनी लिमिटेड

सीआयएन : एल २४११० एमएच १९१९ पीएलसी ०००५६४
नोंदणीकृत कार्यालय : प्रॉस्पेक्ट चेंबर्स, ३१७/३२१, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई-४००००१
दूर.: +९१ २२०४ ८८८१, फॅक्स : + ९१ २२८१ ३६५७
वेबसाईट :www.dmcc.com ई-मेल : dgokhale@dmcc.com

**इक्विटी शेअर होल्डर्स, प्रेफरन्स शेअर होल्डर्स आणि धनकोच्या सभेची जाहिरात आणि सूचना**

**प्रपत्र क्र. सीए.२** (कलम २३०(३) आणि नियम ६ आणि ७ अनुसार)

**कंपनी योजना अर्ज क्र. ७३० सन २०१७**

**दि धरमसी मोरारजी केमिकल कंपनी लिमिटेड** ... **अर्जदार कंपनी**

सूचना याद्वारे देण्यात येते की, दिनांक १० जुलै, २०१७ रोजीच्या आदेशाद्वारे सन्माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाच्या मुंबई बेंचने बोरॅक्स मोरारजी लिमिटेड ('बीएमएल' किंवा 'हस्तांतरक कंपनी') आणि धरमसी मोरारजी केमिकल कंपनी लिमिटेड ('डीएमसीसी' किंवा 'हस्तांतरिती कंपनी') आणि त्यांचे संबंधित भागधारक दरम्यान व्यवस्थेची प्रस्तावित योजना ('योजना' सुधारणेसह किंवा शिवाय विचारात घेणे आणि योग्य वाटल्यास मंजूर करण्यास अर्जदार कंपनीचे शेअरहोल्डर्स, प्रेफरसन्स शेअरहोल्डर्स आणि रु. १०,०००/- पेक्षा ज्ञास्त सुरक्षित धनको आणि असुरक्षित धनको ('पात्र धनको') ची सभा घेण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर आदेश आणि त्यातील निर्देशानुसार पुढे सूचना याद्वारे देण्यात येते की, पात्र धनको इक्विटी शेअरहोल्डर्स आणि प्रेफरन्स शेअर्सहोल्डर्सची सभा इंडियन मर्चंटस् चेंबर्स, कॉन्फरन्स हॉल (वाचलंद हिराचंद हॉल) आयएमसी मार्ग, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथे सोमवार, २८ ऑगस्ट, २०१७ रोजी अनुक्रमे स. ११.००, दु. १२.०० आणि दु. २.०० वा. घेण्यात येणार आहे. त्यावेळी आणि ठिकाणी अर्जदार कंपनीचे पात्र धनको, इक्विटी शेअरहोल्डर्स आणि प्रेफरन्स शेअरहोल्डर्सना हजर राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

सदर योजना आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० अन्वये विवरणपत्राची प्रत अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून किंवा तिचे वकील हेमंत सेठी, अँण्ड कं. स्थित आहे ३०९, न्यू बेक हाऊस, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, काळाघोडा, मुंबई-४०००२३ येथे यांच्या कार्यालयातून विनामूल्य प्राप्त करता येईल. सभेला हजर राहून मतदान करण्यासाठी हक्कदार व्यक्ती/व्यक्तिश: किंवा प्रतिपत्री व्यक्तीद्वारे मतदान करू शकते मात्र सर्व विहित प्रपत्रातील प्रतिपत्री प्रपत्र सभेपूर्वी किमान ४८ तास अगोदर अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. प्रतिपत्री प्रपत्र शेअरहोल्डर्सना पाठविलेल्या सूचनेसह जोडण्यात आले आहेत आणि ते कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून सुद्धा प्राप्त करता येतील.

सन्माननीय न्यायाधिकरणाने इक्विटी शेअरहोल्डर्स आणि प्रेफरन्स शेअर्सहोल्डर्सच्या सदर सभेचे अध्यक्ष म्हणून श्री. लक्ष्मीकुमार नरोत्तम गोकुळदास (संचालक), ते नसल्यास श्री. बिमल ललितसिंग गोकुळदास (सीईओ) ते नसल्यास श्रीमती मितिका लक्ष्मीकुमार गोकुळदास (संचालक) त्या नसल्यास श्री. दिलीप त्रिंबक गोखले (कार्यकारी उपाध्यक्ष आणि कंपनी सचिव) यांची नियुक्ती केली आहे आणि पात्र धनकोंच्या सभेचे अध्यक्ष म्हणून श्री. लक्ष्मीकुमार नरोत्तम गोकुळदास (संचालक) ते नसल्यास श्री. बिमल ललितसिंग गोकुळदास (सीईओ) यांची नियुक्ती केली आहे. वरील नमूद योजना त्यांच्या सभेत इक्विटी शेअरहोल्डर्स, प्रेफरन्स शेअरहोल्डर्स आणि पात्र धनकोद्वारे आवश्यक बहुमताने जी सभेत मंजूर झाली तरी ती त्यानंतर न्यायाधिकरणाच्या मंजुरीच्या अधीन राहील.

सन्माननीय न्यायाधिकरणाने जारी केलेल्या निर्देशानुसार आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ सहवाचता कंपनीत (मॅनेजमेंट अँण्ड अँडमिनिस्ट्रेशन) रुल्स २०१४ आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग रेग्युलेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन २०१५ ('सेबी एलओडीआर रेग्युलेशन्स') च्या रेग्युलेशन ४४ अनुसार अर्जदार कंपनीचे इक्विटी शेअरहोल्डर्स आणि प्रेफरन्स शेअरहोल्डर्सना सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') द्वारे पुरविलेल्या दूरस्थ ई-मतदान सुविधेमार्फत सभेशी संबंधित जारी केलेल्या दिनांक २० जुलै, २०१७ रोजीच्या सूचनेतील प्रस्तावित मसुद्यानुसार योजनेच्या ठरावावर मतदान करण्याचा पर्याय दिलेला आहे. तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ११० सहवाचता कंपनीज (मॅनेजमेंट अँण्ड अँडमिनिस्ट्रेशन) रुल्स २०१४ च्या नियम २० अनुसार कंपनीच्या इक्विटी शेअरहोल्डर्सना पोस्टल बॅलटच्या मार्गाने सभेशी संबंधित जारी केलेल्या दिनांक २० जुलै, २०१७ रोजीच्या सूचनेतील प्रस्तावित मसुद्यानुसार योजनेच्या ठरावावर मतदान करण्याचासुद्धा पर्याय दिलेला आहे.

या संदर्भात कृपया नोंद घ्यावी की :

१. २६ जुलै, २०१७ रोजी अर्जदार कंपनीने परवानगी असलेल्या पद्धतीने त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर शुक्रवार, १४ जुलै, २०१७ रोजी व्यवसाय बंद होतानाच्या कट ऑफ तारखेनुसार अर्जदार कंपनीच्या सर्व इक्विटी शेअरहोल्डर्स आणि प्रेफरन्स शेअरहोल्डर्सना जोडपत्रासह ठरावाचा मसुदा नमूद केलेली सभेची सूचना पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे. पोस्टल बॅलट प्रपत्राचा इक्विटी शेअरहोल्डर्सना पाठविलेल्या सूचनेत समावेश आहे.

२. पोस्टल बॅलट आणि दूरस्थ ई-मतदानामार्फत मतदान करण्याचा मतदान कालावधी शनिवार, २९ जुलै, २०१७ रोजी स. ९.०० वा. सुरू होईल आणि रविवार, २७ ऑगस्ट, २०१७ रोजी सायं. ५.०० वा. संपेल. दूरस्थ ई-मतदानाची सुविधा त्यानंतर बंद करण्यात येईल आणि परवानगी देण्यात येणार नाही. सभासदाने ठरावावर एकदा केलेल्या मतदानात सभासदाला त्यानंतर बदल करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

३. ज्या व्यक्तीची नावे कट ऑफ तारखेस डिपॉझिटरीजकडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील तेच फक्त दूरस्थ ई-मतदान किंवा पोस्टल बॅलटची सुविधा घेण्यास किंवा प्रयोज्यनुसार बॅलट पेपरमार्फत सभेत करण्यासाठी हक्कदार राहतील कोणीही व्यक्ती ज्यांनी १४ जुलै, २०१७ रोजी व्यवसाय बंद झाल्यावर कट ऑफ तारखेनंतर अर्जदार कंपनीचे शेअर्स संपादित केले आहेत आणि अर्जदार कंपनीचे सभासद बनले आहे ते दूरस्थ ई-मतदान किंवा पोस्टल बॅलटमार्फत मतदान किंवा सभेत बॅलट पेपरमार्फत मतदान करण्यासाठी पात्र नाहीत.

४. जी व्यक्ती कट ऑफ तारखेस पात्र धनको आहे तीच फक्त सभेत मतदान करण्यासाठी हक्कदार आहे. कोणीही व्यक्ती ३१ मार्च, २०१७ व्यवसायाची वेळ समाप्त झाल्यानंतर कंपनीचे धनको बनले आहे ते सभेत मतदान करण्यासाठी हक्कदार नाहीत.

५. इक्विटी शेअरहोल्डर्स मतदानाचे फक्त एकच माध्यम वापरू शकतात. जर इक्विटी शेअरहोल्डर्सने दूरस्थ ई-मतदान स्वीकारले असल्यास त्याने पोस्टल बॅलटद्वारे मतदान करू नये, तथापि इक्विटी शेअरहोल्डर्सने पोस्टल बॅलट आणि ई-मतदान दोन्हीद्वारे त्यांचे मतदान केले असल्यास दूरस्थ ई-मतदानाद्वारे केलेले मतदान ग्राह्य धरण्यात येईल आणि पोस्टल बॅलटद्वारे केलेले मतदान अवैध समजण्यात येईल.

६. इक्विटी शेअरहोल्डर आणि प्रेफरन्स शेअरहोल्डर्स ज्यांनी पोस्टल बॅलट किंवा दूरस्थ ई-मतदानामार्फत त्यांचे मतदान केलेले आहे. ते सभेला हजर राहू शकतात, परंतु सभेत मतदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

७. ज्या व्यक्ती सूचना पाठविल्यानंतर अर्जदार कंपनीच्या सभासद बनल्या आहेत. १४ जुलै, २०१७ व्यवसायाची वेळ बंद होताना म्हणजेच कट ऑफ तारखेस शेअर्स धारण केलेले आहेत ते helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात. तथापि, जर तुम्ही दूरस्थ ई-मतदानाकरिता सीडीएसएलकडे अगोदर नोंदणी केली असेल तर तुमचे मतदान करण्यासाठी तुमचा विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकता. तुम्ही जर तुमचा पासवर्ड विसरला असाल तर तुम्ही https://www.cdslindia.com वर उपलब्ध पर्याय 'forgotpassword' वापरून तुमचा पासवर्ड रिसेट करू शकता.

८. इक्विटी शेअरहोल्डर्स रविवार, २७ ऑगस्ट, २०१७ रोजी सायं. ५.०० वा. किंवा पूर्वी अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात यथायोग्य भरलेले आणि सही केलेले पोस्टल बॅलट प्रपत्र पाठवून पोस्टल बॅलटच्या मार्गाने त्याचे मतदान करू शकतात. सदर तारीख आणि वेळेनंतर प्राप्त झालेले पोस्टल बॅलट प्रपत्र हे काटेकोरपणे इक्विटी शेअरहोल्डर्सकडून उत्तर प्राप्त झाले नसल्याचे म्हणून समजण्यात येतील.

९. कोणीही इक्विटी शेअरहोल्डर्स ज्यांना पोस्टल बॅलट प्रपत्र प्राप्त झालेले नाहीत ते अर्जदार कंपनीकडे अर्ज करून आणि info@dmcc.com येथे ई-मेल पाठवून त्याची प्रतिलिपी प्राप्त करू शकतात.

१०. बॅलट आणि मतपत्रिकेमार्फत मतदानाची सुविधा सभेत उपलब्ध करण्यात येईल आणि सभेला हजर असलेले सभासद ज्यांनी पोस्टल बॅलट किंवा दूरस्थ ई-मतदानाद्वारे अगोदर मतदान केलेले नाहीत त्यांना सभेत हक्क वापरणे शक्य होईल.

११. सभेची सूचना अर्जदार कंपनीची वेबसाईट : www.dmcc.com आणि बीएसई लिमिटेडच्या वेबसाईट व्यतिरिक्त http://www.cdslindia.com येथील सीडीएसएलच्या वेबसाईटवरसुद्धा उपलब्ध आहे.

१२. सन्माननीय न्यायालयाच्या निर्देशानुसार श्री. जतिन पोपट, जेएसपी असोसिएटसचे भागीदार हे दूरस्थ ई-मतदानाद्वारे इलेक्ट्रॉनिकली किंवा पोस्टल बॅलट किंवा सभेतील मतदानाचे परिनिरीक्षण करण्यासाठी परिनिरीक्षक म्हणून काम करतील.

१३. मतदानाचे निष्कर्ष पोस्टल बॅलट, दूरस्थ ई-मतदान आणि सोमवार, २८ ऑगस्ट, २०१७ रोजी नियोजित सभेत बॅलटद्वारे मतदानावरील परिनिरीक्षकाचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्वरित अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात घोषित करण्यात येतील. मतदानाच्या निष्कर्षांचा तपशील

१४. अर्जदार कंपनीची वेबसाईट www.dmcc.com वर आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट व्यतिरिक्त सीडीएसएलची वेबसाईट : http://www.cdslindia.com वर सुद्धा दर्शविण्यात येतील.

मुंबई
दिनांक : २६ जुलै, २०१७

**लक्ष्मीकुमार नरोत्तम गोकुलदास**
सभेसाठी नियुक्त अध्यक्ष